ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख १६ जानेवारी, १९५७ | अंक ३

## विविध माहिती

**आस्वान धरणाला जर्मनीची मदत**—इजिप्तमधील नाइल नदीवर आस्वान ह्या ठिकाणीं बांधण्यांत येणाऱ्या प्रचंड धरणासाठी पश्चिम जर्मनींतील क्रप कॉर्पोरेशन कांहीं अटींवर भांडवल देण्यास तयार आहे. पश्चिम जर्मनींतील बांधकामाच्या व विजेच्या इतर कांहीं कंपन्याहि इजिप्तच्या सरकारला सहकार्य देण्यास तयार आहेत. पश्चिम जर्मन सरकारकडून कोठलीहि हमी न घेतां साह्य करण्याची तयारी दाखविण्यांत आली आहे.

**जागतिक बँकेनें दिलेलीं कर्जें**—१९५६ सालीं बँकेनें २४ कर्जें मंजूर केलीं. सर्व कर्जांची एकूण रक्कम ५० कोटी, ७० हजार डॉलर्स असून ही रक्कम १७ निरनिराळया राष्ट्रांना देण्यांत आली आहे. एका वर्षांत देण्यांत आलेल्या रकमेचा हा उच्चांक आहे. कर्जांपैकीं सुमारें ४५ टक्के रक्कम आशिया आणि आफ्रिका ह्या खंडांतील राष्ट्रांना देण्यांत आली आहे.

**पोलंडला अमेरिकेची मदत**—पोलंड व अमेरिका ह्यांच्यांत पोलंडला अमेरिकेनें आर्थिक मदत देण्याच्या वाटाघाटी गेले दोन महिने चालू आहेत. दोन्ही देशांमधील आर्थिक व्यवहार नियमितपणें चालण्यास वाटाघाटींची बरीच मदत होईल असें म्हणतात. अमेरिकेचा शिल्लकी शेतीचा माल व कांहीं कारखानदारी माल पोलंड उधारीनें घेण्याच्या खटपटींत आहे.

**पाकिस्तानला साखरेची विक्री**—भारतीय सरकारनें देशाची गरज भागवून शिल्लक असलेल्या साखरेपैकीं कांहीं साखर पाकिस्तानला विकण्याची तयारी दाखविली आहे. साखरेच्या निर्यातीविषयीं केलेले इतर करार लक्षांत घेऊनहि भारताला २०,००० टन साखर पाकिस्तानला देतां येईल. पाकिस्तानला इतर देशांहून आयात केलेल्या साखरेच्यापेक्षा हिंदी साखर थोडीशी स्वस्त पडेल.

**कालवा साफ करण्यास साह्य**—सुएझच्या कालव्यांतील अडथळे दूर करण्यासाठी सुमारें ४ कोटी डॉलर्स खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या कार्यासाठी ५० लाख डॉलर्स संयुक्त राष्ट्र-संघटनेला देण्याची तयारी अमेरिकेनें दाखविली आहे. मि. हॅमरशील्ड ह्यांनीं इतर राष्ट्रांनाहि खर्चाचा वांटा देण्याची विनंति केली आहे.

**मुलतान येथें पोलादाचा कारखाना**—पश्चिम पाकिस्तानांत मुलतान ह्या ठिकाणीं पोलादाचा कारखाना उभारण्याचें पाकिस्तान सरकारनें ठरविलें आहे. जागेची निवड जर्मन तज्ज्ञांनीं केली आहे. कारखान्यांत प्रारंभीं दरसाल ५०,००० टन पोलाद निर्माण होऊं शकेल. पुण कारखान्याचा विस्तार करून तें २,५०,००० टनांपर्यंत वाढवितां येईल. कारखाना उभारण्यासाठी १७ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे.

**केरळ राज्यांत नवे कारखाने**—केरळ राज्य-सरकारनें राज्यांत नवे कारखाने सुरू केले आहेत. क्विलॉन जिल्ह्यांत एक कांचेचा कारखाना उभारण्यांत आला असून तो लवकरच उत्पादनास सुरवात करील. ह्याशिवाय त्रिवेंद्रम् येथें एक आणि मलबार येथें एक अशा दोन सुताच्या गिरण्याहि काढण्यांत येणार आहेत. तिन्ही कारखान्यांतून मिळून बऱ्याच लोकांना रोजगार मिळेल.

**बरेली येथें रबराचा कारखाना**—भारतांत कृत्रिम रबर तयार करणारा कारखाना काढण्यासाठी सल्ला देणाऱ्या अमेरिकन तज्ज्ञांनीं आपला अहवाल मध्यवर्ती सरकारला सादर केला आहे. कारखान्यासाठी बरेली शहराची निवड करण्यांत आली आहे. बिहारमधील साखर कारखान्यांतून उपवस्तू म्हणून निर्माण करण्यांत येणारें पॉवर अल्कोहल ह्या ठिकाणीं विपुलतनें मिळूं शकेल, म्हणून ही निवड करण्यांत आली आहे.

**घरबांधणीची सहकारी संस्था**—इंदूरपासून ४ मैलांवर गांधीनगर ह्या नांवाची घरबांधणीची सहकारी संस्था स्थापन करण्यांत आली आहे. संस्थेला ४५० एकर जमीन राज्य सरकारनें मोफत दिली आहे. ह्या जागेवर संस्थेतर्फे २,००० घरें बांधण्यांत येणार आहेत. पैकीं १५० घरें बांधून झालीं आहेत.

**रशिअन बोलपटांचा उत्सव**—रशिअन बोलपटांच्या साप्ताहिक उत्सवाचें उद्घाटन भारतीय सरकारच्या माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्री, डॉ. केसकर ह्यांनीं दिल्ली येथें केलें. उत्सवांत दाखविण्यांत आलेले सहा चित्रपट दिल्लीशिवाय मुंबई व कलकत्ता येथेंहि दाखविण्यांत आले.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## गेल्या मोसमांतील साखरेचें उत्पादन

३० ऑक्टोबर, १९५६ अखेर संपलेल्या १९५५–५६ वर्षांत झालेलें साखरेचें उत्पादन व खप ह्यांचे आंकडे १९५४–५५ च्या तत्सम आंकड्यांसह खाली दिले आहेत.

आंकडे हजार टनांचे आहेत.

| | १९५५–५६ | १९५४–५५ |
|---|---|---|
| सुरुवातीचा सांठा (आयात केलेली १,२०,००० टन साखर धरून) | ५६१ | ६८ |
| उत्पादन | १,८६० | १५९० |
| आयात | ५५ | ६०० |
| एकूण पुरवठा | २,४७६ | २,२५८ |
| कारखान्यांतून मोकळी केलेली साखर | १,७४८ | १,२१७ |
| आयात साखरेची विक्री | १७१ | ४८० |
| साखरेचा एकूण खप | १,९१९ | १,६९७ |
| साखरेचा दर माणशीं खप (पौंड) | ११·२२ | १०·०३ |
| ३१ ऑक्टोबर रोजीं शिल्लक हिंदी उत्पादनापैकी | ५५३ | ४४१ |
| आयातीपैकी | ४ | १२० |

### मुंबई राज्यांतील उसाचें व साखरेचें उत्पादन

मुंबई राज्याचा आकार आतां वाढला असला, तरी त्यांतील साखरेच्या धंद्याचा आकार जवळ जवळ कायमच आहे. चालू १५ कारखान्यांत एक नव्या कारखान्याची (दि भावनगर शुगर मिल्स लि., सौराष्ट्र) भर पडली आहे, त्यामुळें एकूण वार्षिक उत्पादनक्षमता २,२९,९०५ टनांची २,३६,९२५ टन झाली आहे. हा अंदाज खालील तीन बाबींवर आधारलेला आहे. (१) सर्व कारखान्यांत मिळून दररोज १३,५०० टन ऊंस (पूर्वी १३,१५० टन) गाळला जातो. (२) गळिताचा हंगाम १५० दिवस चालतो. (३) साखरेचा उतारा ११·७% पडतो.

उसाच्या उत्पादनाचा विचार केला; तर विशाल मुंबई राज्यांत २,२०,००० एकर जमीन उसाखाली आहे; म्हणजे पूर्वीपेक्षा २२,००० ज्यास्त एकर जमीन आतां उसाखाली आहे. उसाचें उत्पादन ५५,२०,००० टन होतें; पूर्वी तें ५१,१६,००० टन होत असे.

### पुण्यांतील मद्रासी शाळेला मद्रास सरकारची ग्रँट

पुण्यांतील मद्रासी विद्यार्थ्यांसाठी चालविण्यांत येणाऱ्या सरस्वती विद्यालय युनियनला मद्रास सरकारनें १०,००० रुपयांची ग्रँट दिली आहे. ही युनियन प्राथमिक शाळा व हायस्कूल चालविते; त्यांत १००० विद्यार्थी आहेत.

### ग्रेटब्रिटनमध्यें पेट्रोल तुटवड्याचा परिणाम

ग्रेट ब्रिटनमधील पेट्रोलच्या तुटवड्यामुळें तेथील मोटार-गाड्यांचा खप कमी झाला आहे. त्यामुळें, दि ब्रिग्ज मोटार बॉडी कंपनी (फोर्ड कंपनीचें एक भावंड) १,००० कामगारांना कमी करीत आहे.

## अधिक कर देण्याची तयारी ठेवा

मध्यवर्ती सरकारचे मंत्री श्री. एम्. सी. शहा ह्यांनीं अहमदाबाद येथें 'आयकर-भवना' चें उद्घाटन केलें. ही इमारत प्रांतीवरील कर वसूल करणाऱ्या खात्यासाठी बांधण्यांत आली आहे. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. शहा म्हणाले कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा खर्च बराच वाढला असल्यानें करांपासून होणाऱ्या उत्पन्नांत मोठ्या प्रमाणावर वाढ करणें आवश्यक झालें आहे. परदेशांकडून मिळणारी आर्थिक मदत अनिश्चित आहे, ही गोष्टहि आपण लक्षांत ठेवली पाहिजे. जादा कर बसवून सुमारें ४०० कोटी रुपयांची रक्कम उभारावी अशी पहिली कल्पना होती. पण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत गुंतवाव्या लागणाऱ्या भांडवलांत वाढ झाल्यामुळें कराच्या बोजांत आणखी बरीच भर घालावी लागेल. दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम यशस्वी झाला म्हणजे समाजवादी पद्धतीची समाजरचना उभारण्याच्या मार्गावर वाटचाल होऊं लागेल. देशांतील पैसा कराच्या रूपानें एकत्र आणण्याच्या सरकारच्या प्रयत्नाशीं सर्वांनीं सहकार्य करणें जरूर आहे. कर देणाऱ्या लोकांच्या अडचणी आणि त्यांना वाटणारी चिंता ह्यांची सरकारला जाणीव आहे. त्यांच्या अडचणी व चिंता ह्यांचा निरास करण्याचे सर्व प्रयत्न करण्यांत येतील. सरकारच्या उत्पन्नांत व कार्यक्षेत्रांत वाढ झाल्यामुळें खर्च वाया जाण्याची शक्यता वाढेल ही भीति अगदींच निराधार म्हणतां येणार नाहीं. दुसरी पंचवार्षिक योजना अंमलांत आणतांना व विकासाचें काम पुरें करतांना व्यर्थ खर्च केला जाणार नाहीं, ह्याविषयीं कडक उपाय योजण्याचा विचार सरकार करीत आहे. तेव्हां लोकांनीं शंका मनांत न आणतां आपल्यावरील कराचा भार सोसण्याची तयारी ठेवावी.

### पोस्ट खात्याच्या कामांत वाढ

| | १९५४–५५ अखेर | १९५३–५४ अखेर |
|---|---|---|
| पोस्ट ऑफिसें | ४९,७९० | ४५,९०७ |
| टेलिफोन्स | २,४७,००० | २,२०,००० |
| टेलिफोन एक्सचेंजेस | ५,०४९ | ४,६०४ |
| टेलिग्राफ कचेऱ्या | ८,७९२ | ८,२३२ |
| जिनसांची देवघेव | २७६ कोटी | ६२७ कोटी |
| तारांची देवघेव | ३०५ लक्ष | २९३ लक्ष |
| ट्रंक टेलिफोन कॉल्स | १५१ लक्ष | १२५ लक्ष |
| उत्पन्न | ४६·६ कोटी रु. | ४४·१ को. रु. |
| खर्च | ४३·९७ को. रु. | ४१·७७ को. रु. |

### पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक

| | १९५४–५५ | १९५३–५४ |
|---|---|---|
| खात्यांची संख्या | | |
| वर्षाचे प्रारंभीं | ५०,६९,८८६ | ४८,२९,६६८ |
| वर्ष अखेर | ५३,८४,१४७ | ५०,६९,८८६ |
| खात्यांतील रक्कम (रु.) | | |
| वर्षअखेर शिल्लक | २,५६,४९,३२,८५९ | २,३१,९५,७४,५९६ |
| प्रत्येक बँकेंतील सरासरी शिल्लक | २,१५,५७६ | १,९६,१४१ |
| प्रत्येक ठेवीदाराच्या खात्यांतील सरासरी शिल्लक | ४७६ | ४५७ |

# अर्थ

बुधवार, ता. १६ जानेवारी, १९५७





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## कुटुंबनियोजनासाठीं योग्य क्षेत्र

कलकत्ता येथें अखिल भारतीय कुटुंबनियोजन परिषदेचें तिसरें अधिवेशन भरलें होतें. भारताच्या नियोजन-समितीचे एक सभासद डॉ. जे. सी. घोष ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन केलें. त्याप्रसंगीं केलेल्या भाषणांत डॉ. घोष म्हणाले कीं, भारताच्या आर्थिक व सामाजिक जीवनाचा पाया म्हणजे खेडीं हीं होत. म्हणून कुटुंबनियोजनाचा प्रसार खेड्यांमध्यें कसा करावा हा खरा प्रश्न आहे. आपल्या देशांत राष्ट्रीय विस्तार योजना आणि समाजविकास योजना ह्या अनेक ठिकाणीं कार्य करीत आहेत. १९६१ च्या सुमारास अशा संघटनांचें एक जाळेंच देशभर पसरलेलें असेल. ह्या संघटनांचा केंद्रासारखा उपयोग करून अधिक आरोग्यकारक व उन्नत जीवन जगण्यासाठी लोकांना कार्यप्रवृत्त करतां येईल. वरील संघटनांच्या कार्याचें निरीक्षण करणाऱ्या सूक्ष्म निरीक्षकांनीं असें नमूद केलें आहे, कीं त्यांच्या कार्यामुळें खेडेगांवांतील लोकांचा उत्साह जागृत झाला असून ग्रामीण भागांतील जीवनाचा कायापालट होऊं लागला आहे. हीं चिन्हें आशादायक आहेत. समाजविकास योजना चालूं असलेल्या प्रत्येक ठिकाणीं एक आरोग्यकेंद्र असणें जरूर आहे. ह्या केंद्रांत डॉक्टर्स, परिचारिका व बाळंतपण करणाऱ्या दाया असल्या पाहिजेत. त्याचप्रमाणें सामाजिक शिक्षण देण्यासाठीहि वेगळे नौकर असले पाहिजेत; आणि त्या सर्वांनीं मिळून एकदिलानें काम केलें पाहिजे. सामाजिक जीवनांत ऐच्छिक मातृ-पितृ-पदाला फार महत्त्वाचें स्थान आहे ही गोष्ट प्रत्येक समंजस माणसाला हळुहळु पटल्याशिवाय राहणार नाहीं. तथापि, गर्भनिरोधाचें सर्व दृष्टीनें योग्य असें साधन हातीं लागल्याशिवाय कुटुंबनियोजनाच्या बाबतींत पूर्ण यश येणें कठीण आहे.

## क्षयरोगविषयक आंतरराष्ट्रीय परिषद

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत शास्त्रांच्या सर्व शाखांबरोबर वैद्यकशास्त्रांतहि खूप प्रगति झाली. क्षयरोग आणि महारोग ह्यांच्यासारख्या रोगांचें निवारण करण्याच्या कामीं अधिक आशा आतां वाटूं लागली आहे. तथापि, रोगनिवारणाच्या बाबतींत अजूनहि स्वयंसंतुष्टतेनें स्वस्थ बसण्याची वेळ आलेली नाहीं. क्षयरोगाबाबत सुद्धां अशीच परिस्थिति आहे. नवी दिल्ली येथें १४ वी आंतरराष्ट्रीय क्षयरोगविषयक परिषद भरली होती. त्या परिषदेचे अध्यक्ष डॉ. पी. व्ही. बेंजामिन ह्यांनीं आपल्या भाषणांत अशी माहिती सांगितली कीं आजहि जगांत निदान ३ कोटी लोकांना क्षयरोगाची बाधा झालेली आहे. आणि ह्या रोगाच्या भक्ष्यस्थानीं दरसाल ५० लाख लोक पडत असतात. गेल्या कांहीं महिन्यांत आंतरराष्ट्रीय राजकारणांत जरी तेढ वाढलेली असली तरी रोगनिवारणाच्या मोहिमेंत मात्र आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढीला लागलेलें दिसून येतें. ह्या बाबतींत जागतिक आरोग्य संघटनेमार्फत चांगलें कार्य चालूं आहे. भारतीय सरकारनें आपल्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत क्षयरोगविरोधी मोहीम चालू ठेवण्याचें ठरविलें आहे. सार्वजनिक आरोग्य राखण्याचा एक भाग म्हणून क्षयरोग-प्रतिबंधक लस टोचण्याचें चालूं ठेवण्यांत येणार आहे. त्याशिवाय क्षयरोगाबाबत सल्ला देणारीं व औषधोपचार करणारीं ३०० आरोग्यकेंद्रें स्थापन करण्यांत येणार आहेत. क्षयरोग्यांना रोगमुक्त करूनच सर्व कांहीं भागत नाहीं. असे रोगी शरीरानें कांहीं प्रमाणांत पंगू झालेले असतात. तेव्हां त्यांच्या शरीरप्रकृतीस झेपेल अशा प्रकारचें बेताचें काम त्यांना पुरविण्याची जबाबदारीहि स्वीकारली गेली पाहिजे. अशा रीतीनें त्यांना आर्थिक दृष्ट्या आपल्या पायावर उभे करण्याची आवश्यकता पुढारलेल्या देशांतून ओळखली गेलेली आहे.

## ब्राझिलचें भारताला आव्हान

ब्राझिल ह्या दक्षिण अमेरिकेंतील देशांत मँगेनीझच्या खाणी मोठ्या प्रमाणांत उपलब्ध झाल्या असून अमेरिकन भांडवलाच्या मदतीनें आतां त्यामधून उत्पादन सुरू झालें आहे. ॲमेझॉन नदीकांठच्या जंगलांतील ह्या खाणी समृद्ध असून त्यामधील खनिज माती नदीपर्यंत वाहून नेण्यास १५० मैल लांबीचा रुंद रुळाचा रेल्वेमार्गहि तयार करण्यांत आला आहे. मँगेनीझच्या मातीची निर्यात करण्यासाठी नवें बंदरहि बांधण्यांत आलें आहे. नव्या कंपनीच्या भांडवलापैकीं ४९ टक्के भांडवल बेथेलहेम स्टील कॉर्पोरेशन ह्या अमेरिकन कंपनीच्या मालकीचें असून बाकीचें ५१ टक्के ब्राझिलच्या नागरिकांचें आहे. मँगेनीझच्या उत्पादनाचा विकास करण्यासाठी अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेनें ६.७५ कोटी डॉलर्सचें कर्ज दिलेलें होतें. नव्या खाणींमधील उत्पादन पूर्णतया होऊं लागलें म्हणजे भारताच्या अमेरिकेंतील मँगेनीझच्या बाजारपेठेला चांगलेंच आव्हान दिलें जाईल. सध्यां भारत हा ह्या धातूचा सर्वांत मोठा उत्पादक आहे. अमेरिका आणि रशिआ ह्या राष्ट्रांत शीतयुद्ध सुरू झाल्यापासून रशिआंतील कच्चें मँगेनीझ अमेरिकेला मिळेनासें झालें. अर्थातच पोलादाच्या उत्पादनासाठी लागणारें हें खनिज अमेरिका मुख्यत: भारताकडून घेऊं लागली. मँगेनीझची निर्यात करण्यामुळें भारताला मोठ्या प्रमाणांत डॉलर्सचें चलन मिळतें. ब्राझिलमधील खाणींच्या गटांतून दरसाल ७ लाख टन अशुद्ध मँगेनीझ निघूं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे. बहुतेक सर्व उत्पादन अमेरिकेला निर्यात येईल. ब्राझिलच्या दुसऱ्या एका भागांत युनायटेड स्टेट्स स्टील ही कंपनीहि मँगेनीझच्या खाणींचा विकास करण्याच्या प्रयत्नांत आहे. ह्या खाणींचें उत्पादनहि लवकरच सुरू होईल.

## देवकरण नानजी बँकिंग कं. लि.

वरील बँकेस १९५६ मध्यें १६.६३ लक्ष रु. नफा झाला. अहवालाचे वर्षी ठेवी १६.१२ कोटी रु. च्या १९.३५ कोटी रु. वर गेल्या आणि खेळतें भांडवल २०.०२ कोटी रु. चें २४.५ कोटी रु. झालें. डिव्हिडंड ५% चें ६% करण्यांत आलें आहे.

## हीं लक्षणें ठीक नव्हेत

रिझर्व्ह बँक १९३५ मध्यें स्थापन झाली, तेव्हांपासून तिचे डायरेक्टर असलेले श्री. पुरुषोत्तमदास ठाकूरदास, ह्यांना त्यांच्या जागेवर दीर्घकाळ रहाण्याची इच्छा नसल्यानें, त्यांची पुनः नेमणूक करण्यांत येऊं नये असें त्यांनीं बँकेस कळविलें आहे. बँकेचे गव्हर्नर, श्री. बी. रामराव, ह्यांनीं नुकतेंच आपलें त्यागपत्र दिलें. त्यांच्या जागीं डेप्युटि गव्हर्नर श्री. के. जी. आंबेगांवकर ह्यांची तात्पुरती नेमणूक सरकारनें केली आहे. अर्थमंत्र्यांनीं गेल्या कांहीं आठवड्यांत जीं वक्तव्यें केलीं; त्यांचा हा परिणाम आहे, असें समजतें. रिझर्व्ह बँक आणि स्टेट बँक ह्यांना कारकुनी वृत्तीनें पछाडलेलें आहे; त्यांना नव्या गोष्टी करून पहाण्याची इच्छाच नाहीं; अशा स्वरूपाचे उघड आरोप अर्थमंत्र्यांनीं केले होते. "कोणत्याहि बिगर-सरकारी इसमानें रिझर्व्ह बँकेशीं आपला संबंध कायम ठेवणें देशाच्या हिताचें नाहीं" अशा कडक शब्दांत श्री. ठाकुरदास ह्यांनीं आपला संताप व्यक्त केला आहे. स्टेट बँकेचे चेअरमन डॉ. मथाई व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. हंडु ह्यांनींहि त्या संस्थेंतून मागेंच अंग काढून घेतलें आहे. अर्थमंत्र्यांच्या सारख्या जबाबदार गृहस्थानें एकतर्फी मत बनविणें व त्याची जाहीर वाच्यता करणें, ह्या गोष्टी कोणत्याहि संबंधित, निःस्वार्थी तज्ज्ञाला बोचणाऱ्याच आहेत. श्री. देशमुख ह्यांच्यासारख्या तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाला भारत मुकलेला आहे, तो इतिहासहि ताजा आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कठीण काळांत, सरकारनें आर्थिक तज्ज्ञांचें सहकार्य गमावणें व आपले निर्णय हेंच देशाच्या हिताचें व व्यवहार्य आहेत अशा हट्टानें ते बाकीच्यांवर लादणें इष्ट नाहीं. अभ्यासू वृत्तीनें प्रत्येक प्रश्नाचा जबाबदारीच्या भावनेनें विचार करणारांना त्यामुळें स्थानच उरणार नाहीं. कोणत्याहि सोईस्कर उद्दिष्टांची घोषणा करून व तीं उद्दिष्टें गांठण्यांत तज्ज्ञांची आडकाठी येत आहे असें म्हणून भागणार नाहीं; घडी बिघडली तर पुनः त्यांचेच पाय धरावे लागतील.

## ऑडिटरच्या कामाचें स्वरूप

### हायकोर्टाचा अभिप्राय

कलकत्ता हायकोर्टानें श्री. एच. सी. दास ह्यांना इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौन्टंट्सच्या सभासदांतून कमी करून त्यांना एक वर्षपर्यंत ऑडिटर म्हणून काम करण्यास बंदी केली आहे. श्री. दास ह्यांच्याविरुद्ध इन्स्टिटयूटनें त्याबाबत कायद्याप्रमाणें अर्ज केला होता, त्याची चौकशी करून हायकोर्टानें हा हुकूम केला. श्री. दास ह्यांची फर्म (एच. सी. दास आणि कं.) भाग्यलक्ष्मी विमा कंपनी लि. चीं १९३६ ते १९५१ पर्यंत ऑडिटर होती. कंपनीचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर ॲडमिनिस्ट्रेटरनें कंपनीचे हिशेब दुसऱ्या ऑडिटराकडून तपासून घेतले, तेव्हां त्यांत बऱ्याच चुका आढळल्या. त्यानंतर असिस्टंट कंट्रोलर ऑफ इन्शुअरन्सनें श्री. दास ह्यांचेविरुद्ध इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौन्टंट्सकडे तक्रार केली. "कंपनीची खरी परिस्थिति काय आहे आणि तिचा ताळेबंद कसा तयार करण्यांत आला आहे, हें समजून घेण्याचा ऑडिटरनें मुळींच प्रयत्न केला नाहीं. त्यानें चौकशा केल्याचें आढळलें नाहीं किंवा अशा चौकशांचीं उत्तरेंहि दाखल झालेलीं नाहींत. व्यवस्थापकांनीं दिलेली माहिती व याद्या ऑडिटरनें जास्त चौकशी न करतां ग्राह्य धरल्या, असें त्यानेंच म्हटलें आहे. जो ऑडिटर शेअरहोल्डर्स व पॉलिसी होल्डर्स ह्यांचे संबंधांतील त्याच्या कर्तव्याबाबत संकुचित वृत्ति धरतो व व्यवस्थापकांचें म्हणणें चौकशीविना मान्य करतो, तो त्याची नेमणूक करणारांच्या हिताची जपणूक करीत नाहीं; त्यांचा तो घातच करतो." असें सरन्यायाधिशांनीं निकालपत्रांत नमूद केलें आहे.

## परदेशीय हुंडणावळ सुलभतेनें मिळणार नाहीं

भारताबाहेर प्रवासाला जाणाऱ्या प्रत्येकाला दोन वर्षांकरितां ७५० पौंड इतकी परदेशी हुंडणावळ भारत सरकार उपलब्ध करून देत असे. त्याला रिझर्व्ह बँकेची पूर्व-संमति लागत नसे. परदेशी हुंडणावळीची बचत करण्याच्या दृष्टीनें, सरकारनें ७५० पौंडांची हुंडणावळ देणें १ जानेवारी, १९५७ पासून बंद केलें आहे. शैक्षणिक, धंद्याकरितां, वैद्यकीय कारणासाठीं, वगैरे प्रवाशांना ही बंदी लागू पडणार नाहीं.

## कॅलेंडरांची साभार पोंच

१ किर्लोस्कर बंधु लि., किर्लोस्करवाडी.
२ सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., माळीनगर.
३ भारत इं. बँक लि., पुणें.
४ राष्ट्रभाषा प्रचारसमिति, वर्धा.
५ बंगाल कोल सप्लाइंग फर्म, पुणें.
६ अनाथ विद्यार्थी गृह, पुणें.
७ कन्सॉलिडेटेड न्युमॅटिक टूल कं. लि., मुंबई,
८ बेलापूर शुगर कं. लि., बेलापूर.
९ डेक्कन बुकस्टॉल, पुणें.
१० यु. स्टे. इन्फर्मेशन सर्व्हिस, मुंबई.
११ श्रीसमर्थ प्रेस रामदास मुद्रणालय, ठाणें व मुंबइ.
१२ महाराष्ट्र राष्ट्रभाषा, पुणें.
१३ रेखा फर्निशर्स, पुणें.
१३ सोवनी (प्रायव्हेट) लि., मुंबई.

**जळणांत बचत करणार**—रेल्वेसाठी वापरण्यांत येणाऱ्या कोळशांत कशी बचत करावी तें शिकविण्यासाठी बिहारमधील धनबाद येथें एक शिक्षणकेंद्र उघडण्यांत येणार आहे. भारताच्या कोळशाच्या उत्पादनापैकीं ३३ टक्के कोळसा रेल्वेखातें घेतें. रेल्वेचें कोळशाचें बिल दरसाल सुमारें ३९ कोटी रुपये होतें. रेल्वे हें भारतीय कोळशाचें सर्वांत बडें गिऱ्हाईक आहे.

खर्चात बचत करा व पैसा शिलकीत टाका
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.
सोनें व सोन्याचे दागिने यांच्या
तारणावर माफक दरानें कर्जें
दिलीं जातात.

शाखा:
फोर्ट, दादर, माहिम,
पुणें, बेळगांव.

## नासिक डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्ड लि.

### नासिक सहकारी शिक्षण वर्गाचा रिझल्ट

**पहिला वर्ग**—१ संपत नामदेव आवारे.

**दुसरा वर्ग**—२ घनश्याम मुरलीधर भट, ३ नाना तुकाराम पाटील, ४ पंढरीनाथ ताराचंद भावसार, ५ जयराम दशरथ कोंढरे, ६ माधव दामोदर भागवत, ७ गुलाब अहमद तांबोळी, ८ बाबुराव शिवराम पवार, ९ नरेंद्रकुमार प्रभुता महाजन.

**तिसरा वर्ग**—१० धोंडिराम दादा भावसार, ११ मधुकर लक्ष्मण बेलन, १२ मुरलीधर शंकर गडाक, १३ गणपत माधव पवार, १४ जगन्नाथ गणपत सोनार, १५ रघुनाथ रामचंद्र कोष्टी, १६ मारुती विठ्ठलराव शिंदे, १७ विठ्ठल रामभाऊ गोवर्धने. १८ काशीनाथ रघुनाथ शेरे, १९ माधव नरहर करकळे, २० देवदत्त यशवंत घोडके, २१ यशवंत प्रल्हाद जवळेकर, २२ राजाराम हेमराज गवळी, २३ त्रंबक दादा भगुरे, २४ बबन शिवराम सोनवणे, २५ अबदुल हमिद चांद मुल्ला, २६ सोनु दामोदर पिंगटे, २७ रावसाहेब रामचंद्र कुलकर्णी, २८ परशराम आप्पाजी देशमुख, २९ धोंडिराम बापुजी नवले, ३० विठ्ठलराव गेंदुबुवा नागपुरे, ३१ आसाराम छगन पाटील, ३२ शंकर बाळाजी बुटे.

---

### जळगांव को. ट्रेनिंग स्कूल

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिटयूट व महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी बोर्ड यांचे विद्यमानें जळगांव येथें "जळगांव को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग स्कूल" दिनांक १ जानेवारी, १९५७ पासून सुरू झालें आहे. या विद्यालयाचा उद्घाटन समारंभ नामदार श्री. वसंतराव नाईक, सहकार मंत्री, मुंबई राज्य, यांचे हस्तें गुरुवार दिनांक १० जानेवारी, १९५७ रोजीं दुपारीं ४ वाजतां नूतन मराठी विद्यालयाचे आवारांत झाला.

---

**गौहत्ती येथें खेळांचा आखाडा**—नॅशनल स्पोर्टस कौन्सिल ऑफ आसामच्या गौहत्ती शाखेनें गौहत्ती येथें खेळांसाठी एक आखाडा बांधण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी १६ लाख रुपये खर्च येईल. त्यासाठी २ लाख रुपये देण्याचें आसामच्या सरकारनें कबूल केलें आहे. आखाड्यांत फुटबॉलचीं दोन मैदानें, क्रिकेटचें एक मैदान, पोहण्याचा एक तलाव, इत्यादींची व्यवस्था करण्यांत येईल.

**बोटींची संख्या वाढविण्यासाठी**—भारतीय सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत सागरी वहातुकीच्या बोटींत वाढ करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामीं इटलीकडून मदत घेण्यासाठी उभयता देशांत एखादा करार घडून येण्याची शक्यता आहे. इटलींतील बोटींच्या कारखान्यांतून भारतासाठी बोटी बांधण्यांत याव्या, असें सुचविण्यांत येत आहे.

**साखर कामगारांना बोनस**—उत्तर प्रदेश सरकारनें राज्यांतील साखरेचे कारखानदार व कामगार ह्यांच्या प्रतिनिधींचें एक मंडळ बोनसचा वाद मिटविण्यासाठी नेमलें होतें. मंडळानें तडजोड घडवून आणली आहे. तडजोडींत ठरल्याप्रमाणें साखर कामगारांना १९५४-५५ व १९५५-५६ ह्या सालांचा बोनस म्हणून १४२ लाख रुपयांची रक्कम द्यावयाची आहे.

**अहमदाबादचें रेल्वे स्टेशन**—अहमदाबादचें नवें रेल्वे स्टेशन बांधण्यासाठी रेल्वेबोर्डानें खर्चाला मंजुरी दिली आहे. १९५७-५८ मध्यें कामास प्रारंभ करण्यांत येईल. रेल्वे पॅसेंजर्स असोसिएशननें इमारतीच्या तपशिलाची मागणी केली आहे.

## ब्रिटनचा कापडाचा धंदा

ब्रिटनच्या कापडाच्या धंद्याचें एक प्रतिनिधी मंडळ भारतीय कापडाच्या धंद्याच्या प्रतिनिधींशीं विचारविनिमय करण्याकरतां आलें आहे. मंडळांत आठ प्रतिनिधी असून त्यांचें नेतृत्व ब्रिटनच्या कॉटन बोर्डाचे अध्यक्ष सर रूथर्ट क्रेग त्याच्याकडे आहे. भारताचे पंतप्रधान श्री. नेहरू ह्यांनीं उभयतां देशांतील कापडाच्या धंदेवाल्यांनीं अधिक सहकार्यानें काम करावें असें सुचविलें होतें. ह्या सूचनेस अनुसरून हें मंडळ आलें आहे. गेल्या कांहीं वर्षांत भारताकडून स्वस्त दरांचें व आयात-जकात नसलेलें कापड ब्रिटनमध्यें मोठ्या प्रमाणावर आयात करण्यांत येत आहे. त्यामुळें लँकेशायरमधील कापडाच्या गिरण्यांची परिस्थिति बिकट झाली आहे. गेल्या वर्षीच्या ११ महिन्यांत अशा प्रकारचें ११·८ कोटी चौरस वारांपेक्षा अधिक कापड ब्रिटनमध्यें आयात करण्यांत आलें. त्याशिवाय हाँगकाँगमधून ५·१ कोटी वार कापड आयात झालें, तें वेगळेंच. ब्रिटनकडे पाठविण्यांत येणाऱ्या कापडावर भारत आपण होऊनच कांहीं निर्बंध घालील तर ब्रिटनच्या कापडवाल्यांना तें पाहिजे आहे. तशी कांहीं खटपट करण्यासाठीच त्यांचें मंडळ भारतांत आलें आहे. ब्रिटिश गिरणीवाल्यांचें म्हणणें असें आहे कीं, भारताकडून व हाँगकाँगकडून येणाऱ्या कापडामुळें व्यापाराची नेहमींची घडी पार विसकटून गेली आहे आणि लँकेशायरमधील कित्येक गिरण्या बंद कराव्या लागल्या आहेत. आयातीचें प्रमाण ठरवून देण्यास ब्रिटिश सरकारनें नकार दिला आहे. कॉमनवेल्थ गटांतील राष्ट्रांतील व्यापार ज्या तत्त्वांवर चालला पाहिजे त्या तत्त्वांशीं विरोधी वागणूक करण्याची सरकारची तयारी नाहीं.


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

-भांडवल-

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १६,००,००० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | ८,७५,००० |
| खेळतें भांडवल | रु. | ७ कोटींचे वर |

: शाखा :

अहमदनगर, अमरावती, अकोला, औरंगाबाद, बेळगांव, मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर व जव्हेरी बाजार), भिवंडी, चाळिसगांव, धुळें, हरिहर, हुबळी, द. हैद्राबाद, जळगांव, जालना, कल्याण, किर्लोस्करवाडी, कोल्हापूर, कोपरगांव, नागपूर, नाशिक, नांदेड, पनवेल, पुणें (भवानी पेठ, डेक्कन जिमखाना व खडकी), रत्नागिरी, सांगली, सोलापूर, श्रीरामपूर व ठाणें.

मुख्य कचेरी
थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग,
मॅनेजर.

टेलिफोन नं. २४८३ "तारेचा पत्ता CENCOBANK"

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

—स्थापना १९१७—

★ लोकशाही राज्ययंत्रणा आणि देशव्यापी नियोजन यांची सांगड घालून समाजवादी अर्थरचना प्रत्यक्षांत आणण्याचा अभिनव प्रयोग आज आपण करीत आहोंत.

★ सहकार हा लोकशाही नियोजनाचा प्राण आहे.

★ लोकशाही नियोजनाचें दुसरें पाऊल—दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी होण्यासाठीं आपल्या बचतीची गरज आहे.

★ सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या आमच्या बँकेंत आपली बचत गुंतवा आणि भारताच्या दुरुस्तीचे शिल्पकार व्हा.

खालील बोलके आंकडे बँकेच्या सर्वांगीण प्रगतीची कल्पना देतील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भागांचें भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भागांचें भांडवल | रु. | ९,२५,९५० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | ८,६८,५१८ |
| एकूण ठेवी | रु. | १,७६,७९,३१० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,०७,९४,४१० |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.



स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,११,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | रु. ३-०-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ” | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ” | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

### १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



## दि सांगली बँक लि.

सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. | ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.

# पश्चिम महाराष्ट्राचा औद्योगिक विकास

लेखक : श्री. म. ना. गोगटे, बी. एस्सी. ( ऑनर्स )
बी. एस्सी. (टेक्)

( २ )

## नवीन उद्योगधंदे

प. महाराष्ट्रांत नवीन करतां येण्यासारख्या उद्योगधंद्यांची खालीलप्रमाणें वर्गवारी होतेः—

### ( अ ) सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंदे

( Public Sector Industries )

प. महाराष्ट्रांत सरकारी क्षेत्रांतील खालील उद्योगधंदे वसविण्याची शक्यता आहे. सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंदे जास्तींतजास्त प्रमाणांत महाराष्ट्रांत आणविण्याच्या दृष्टीनें राजकारणी पुढारी व समाजधुरिणांनीं सरकारकडे आपलें वजन खर्च करणें आवश्यक आहे. हें न केल्यानें कैक वेळां महाराष्ट्रांत इतर दृष्टींनीं अनुकूल परिस्थिति असूनहि असें सरकारी उद्योगधंदे गमाविल्याचीं उदाहरणें थोडीं नाहींत.

प. महाराष्ट्रांत पुढील धंदे काढतां येतील.

**( १ ) कराड येथें अमोनिअम सल्फेटचा खत-कारखानाः—** कोयना योजनेंतील विद्युत शक्ति वापरून इलेक्ट्रोलिटिक पद्धतीनें अमोनिअम सल्फेट, अमोनिअम सल्फेट-नायट्रेट, व युरीया हें खतक्षार करतां येण्यासारखे आहेत. रोजीं ६०० टन क्षार बनविण्याचा कारखाना सुमारें २५ कोटी रुपयांत होईल.

( २ ) सुमारें १ कोटी रुपये खर्चून मुंबईजवळ दुसरा डी. डी. टी. चा कारखाना सरकारनें काढावा.

( ३ ) ब्रॉडगेज व मीटरगेज रेल्वे मनमाड व पुणें या दोन ठिकाणीं एकत्र येतात. आगगाड्यांचे उतारूवाहू डबे व मालवाहू वाघिणी तयार करण्याचा कारखाना, या ठिकाणीं निघूं शकेल.

( ४ ) पश्चिम किनाऱ्यावर रत्नागिरीचे जवळ ५०० टनापर्यंतचीं जहाजें व गलबतें तयार करण्याचा सुमारें १ कोटी रुपये भांडवलाचा शिपयार्ड सरकारनेंच काढल्यास सोयीचें होईल.

### ( ब ) खाजगी क्षेत्रांतील उद्योगधंदे

( Private Sector Industries )

( १ ) अॅल्युमिनियमः—कोल्हापूरच्या नाजिक एक सरकारी अगर खाजगी कारखाना काढणें शक्य आहे. सांप्रत आपलें उत्पादन सुमारें १० हजार टन असून तें तिप्पट होणें आवश्यक आहे. या कारखान्यास लागणारी वीज राधानगरी ग्रिड अगर कोयना योजना यांपासून मिळूं शकेल.

( २ ) लोखंडाचे गोळ, गज, फर्निचर, हार्डवेअर, कुलुपें वगैरे तयार करण्याचे कारखाने पुणें, सातारा, कोल्हापूर या टापूंत निघण्यासारखे आहेत. तसेंच तांबें-पितळ वगैरे धातूंचे पत्रे, हार्डवेअर, बेअरिंग्ज वगैरे बनविणाऱ्या फाऊंडरीजहि या भागांत निघूं शकतील.

( ३ ) पुणें-कोल्हापूरजवळ शेतीला उपयोगी लहान ट्रॅक्टर्स व इतर आयुधें तयार होऊं शकतील.

( ४ ) मोटारींप्रमाणेंच जीपगाड्या तयार करण्याचा आणखी एक कारखाना काढणें प. महाराष्ट्रांत शक्य आहे.

( ५ ) सायकलींचे सुटे भाग ( उदा. दिवा, पंप, पेडल, ब्रेक, चामडी बैठक वगैरे ) तयार करणारीं ८-१० केंद्रें प. महाराष्ट्रांत काढतां येतील. यासाठीं सुमारें २५ लाख रुपये भांडवल लागेल. सध्यां सायकली तयार करणाऱ्या कारखान्यांची उत्पादन-शक्ति वाढविणेंहि शक्य आहे.

( ६ ) साताऱ्याजवळ कंदील तयार करण्याचा कारखाना निघूं शकेल.

( ७ ) कापडगिरण्यांना आवश्यक अशी टेक्स्टाईल मशिनरी बनविणारे १-२ कारखाने निघण्यासारखे आहेत.

( ८ ) रेल्वेला लागणारे स्लीपर्स, कास्टिंग्ज व इतर विशिष्ट सुटे भाग बनविणाऱ्या फाऊंडरीज होऊं शकतील.

( ९ ) टाइपरायटर्स, बॉबिन्स, शटल्स, वगैरेचे कारखाने प. महाराष्ट्रांत होण्याची सोय आहे.

( १० ) साखरेचे नवीन १२ कारखाने प. महाराष्ट्रांत होऊं घातले आहेत. त्या दृष्टीनें निदान कांहीं प्रमाणांत साखरेच्या उत्पादनाची यंत्रसामुग्री तयार करणारा व सुटे भाग पुरविणारा कारखाना होऊं शकेल.

( ११ ) सुमारें ५० लाख रुपये खर्चून रबरी चिजा तयार करणारे निरनिराळे कारखाने प. महाराष्ट्रांत होण्यासारखे आहेत. रेल्वेला निरनिराळे रबराचे अनेक सुटे भाग लागतात. रबरी धांवा, नळ्या, खेळणीं वगैरे बनविणेंहि शक्य व फायदेशीर आहे. त्याचप्रमाणें प्लास्टिकच्या वस्तू तयार करण्याचेहि कारखाने काढतां येतील.

( १२ ) कॅमेरा, दुर्बिणी ( Optical instruments ) शाई, छापखान्याची शाई, टाईप, स्टेशनरी, चामड्याच्या वस्तू बनविणारे छोटेखानी कारखाने होण्यास वाव आहे.

( १३ ) चिनीमातीचें इन्स्युलेटर्स, सॅनिटरी वेअर वगैरे बनविणें शक्य आहे.

( १४ ) साखरेची फन्फेक्शनरी व सिरप्स खास करून निर्यातीसाठीं करण्यास वाव आहे.

( १५ ) वेंगुर्ला, रत्नागिरीजवळ मासे, आंबे वगैरे व नाशिक अगर पुणें येथें फळफळावळ हवाबंद डब्यांत सांठविण्यासाठीं कॅनिंगचे कारखाने काढावेत, यांस भांडवल सुमारें ५० लाख रुपये लागेल.

( १६ ) रेयॉन ( कृत्रिम रेशीम ) व कागद या कारखान्यांना आवश्यक अशी यंत्रसामुग्री व सुटे भाग तसेंच आगबोटींस लागणारीं इंजिनें, पंप वगैरे सामुग्री तयार करणारे कारखाने निघणें शक्य आहे.

( १७ ) डांगच्या जंगलांतील बांबूंपासून कागदाचा लगदा व कागद ( रोजीं १०० टन ) करण्याचा कारखाना निघण्यास अनुकूल परिस्थिति आहे.

( १८ ) प. महाराष्ट्रांत वीज-उत्पादन आतां मोठ्या प्रमाणांत होऊं लागेल. ही वीज ग्राहकांना पुरविण्यासाठीं आवश्यक असे ट्रॅन्स्फॉर्मर्स, स्विचगिअर, A. C. S. R. केबल्स बनविणें, त्याचप्रमाणें कॉम्प्रेसर्स, पंखे, मोटर्स, बॉयलर्स, पेट्रोल इंजिनें वगैरे तयार करण्याच्या दृष्टीनें कारखाने निघूं शकतील.

( १९ ) सहकारी तत्त्वावर चामडीं कमाविण्याचे तसेंच चामड्याचें चप्पल, बूट वगैरे वस्तू बनविण्याचे कारखाने आणखी होऊं शकतील.

( २० ) तयार मालाची प्रत मोजण्यामापण्याच्या दृष्टीनें वापरण्यांत येणारीं निरनिराळ्या तऱ्हेचीं टूल्स व इन्स्ट्रूमेंट्स तयार करतां येतील.

( २१ ) कल्याणजवळ कापडास लागणारे रंग ( Dyes ) तयार करणारे कारखाने आहेत त्यांचें उत्पादन वाढविण्याची योजना आंखतां येईल.

( २२ ) चिपळूणजवळ कॉस्टिक सोडा व क्लोरिनचा कारखाना ( कोयना वीज वापरून ) व्हावा. सोडाॲशचें आपलें सांप्रतचें उत्पादन ९०,००० टन असून तें दुप्पट होणें जरूर आहे. सोडिअम हायड्रोसल्फाईट, हायड्रोक्लोरिक ॲसिड वगैरे रसायनांचेंहि उत्पादन वाढविण्यास वाव आहे.

( २३ ) सिमेंट—भारताचें सध्यांचें सिमेंटचें उत्पादन ४ लाख टँन असून निरनिराळया योजनांच्या पूर्ततेच्या दृष्टीनें आणखी ४ वर्षांत हें उत्पादन वार्षिक १० लाख टन येवढें होणें आवश्यक आहे.

या दृष्टीनें प. महाराष्ट्रांत सिमेंटचा कारखाना होण्याच्या शक्याशक्यतेचा विचार व्हावयास हवा.

( २४ ) तावदानी कांच, इंजेक्शन्सची फायल्स व ॲम्प्यूल्स वगैरे बनविणारा कारखाना उरणजवळ होऊं शकेल. तेथें कांचेस आवश्यक अशी रेती, सोडा ॲश वगैरे उपलब्ध होईल.

( २५ ) सहकारी पद्धतीवर नवीन १२ साखरकारखाने महाराष्ट्रांत होणार असल्याचें वर नमूद केलेंच आहे.

( २६ ) साखरेच्या मळीपासून ( मोलॅसिस ) आल्कोहोल व Solvents तयार करणारे कारखाने निघाले पाहिजेत. १९६० चे सुमारास अशारीतीनें ५० लाख गॅलन आल्कोहोलचें उत्पादन होण्याइतकी मळी उपलब्ध होईल. या दृष्टीनें अबकारी नियंत्रणें मात्र थोडीं ढिलीं होणें आवश्यक आहे.

( २७ ) वेल्डिंगच्या कामासाठी उपयोगी असा ॲसेटिलीन गॅस पुरविण्याच्या दृष्टीनें कॅलशियम कार्बाईडचा कारखाना ठाण्याजवळ निघण्याची सोय आहे. यासाठीं सुमारें ५० लाख रुपये भांडवल लागेल.

( २८ ) जंगलविभागांतून कोळसा तयार करतांना ( Wood Distilleries ) वापरांत याव्यात. यामुळें निरनिराळीं बहुमोल रसायनें हातीं लागतील.

( २९ ) आगपेट्यांचे छोटेखानी कुटीरोद्योग चालू करण्यास सरकारनें प्रोत्साहन दिलें आहे. हे प्रयोग ग्रामीण भागांत वाढले पाहिजेत.

( ३० ) लोंकरी कापडाच्या गिरण्यांच्या उत्पादनांत वाढ करणें शक्य आहे.

( ३१ ) खारपाड्याजवळ कृत्रिम रेशमाचा कारखाना निघण्याच्या दृष्टीनें सोयी उपलब्ध आहेत. मात्र यासाठी दिवा-दासगांव रेल्वे होणें अगत्याचें आहे. खाजगी भांडवल येथें कारखाना काढण्यास तयार आहे.

( ३२ ) सूत व कापडधंदे:—मालेगांवजवळ एक व इचलकरंजीजवळ एक अशा दोन ठिकाणीं सहकारी पद्धतीवर चालणारीं कापड व सूत यांच्या रंगकाम, ब्लीचिंग, कॅलेंडरिंग इत्यादि उपचारांचीं केंद्रें चालू होणें इष्ट असून सरकारनें त्यांस प्रोत्साहन दिलें पाहिजे. त्याचप्रमाणें जाड धागा बनविणारें प्रयोगादाखल निदान हजारपांचशें ऑटो स्पिनर्स चालविण्यास सहकारी संस्थांना उत्तेजन मिळणें आवश्यक आहे.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. मल्हारराव बाबुराव बेंडे, ( ऑ. ट्रेझरर )
श्री. आनंदराव पांडुजी ढोरे सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन ,,
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे ,,
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख ,,
श्री. मनोहर रामजी नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखकः—श्री. वा. काळे, संपादक, " अर्थ "
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.